नवी मुंबई, वसई-विरार व कोल्हापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२१ व अन्य महानगरपालिकेतील रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीकरिता मतदार यादी तयार करण्याबाबतचे आदेश.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.-रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र. ३ /का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०२ फेब्रुवारी, २०२१

निवडणूक प्राथम्य

प्रति,
आयुक्त,
नवी मुंबई, वसई-विरार व कोल्हापूर तसेच
नाशिक, धुळे, परभणी, ठाणे, अहमदनगर, नांदेड-वाघाळा,
नागपूर, मिरा-भाईंदर, मालेगाव, पिंपरी-चिंचवड, उल्हासनगर,
सोलापूर, सांगली-मिरज-कुपवाड, अकोला,भिवंडी निजामपूर व पुणे महानगरपालिका.

विषय :- नवी मुंबई, वसई-विरार व कोल्हापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२१ व अन्य १६ महानगरपालिकांतील २५रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीकरिता मतदार यादी तयार करण्याबाबतचे आदेश.

संदर्भ:- १) राज्य निवडणूक आयोगाची अधिसूचना क्र.रानिआ /मनपा-२०१९/प्र.क्र.७/का.५, दि. ३१/१/२०२०

२) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ /मनपा-२०२०/प्र.क्र.३/का.५, दि. २४/२/२०२० अन्वये देण्यात आलेला मतदार यादीचा कार्यक्रम.

३) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.७/का.५ दि. १७/३/२०२०

४) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ / मनपा-२०२०/प्र.क्र.३/का.५, दि. १० डिसेंबर, २०२०

५) राज्य निवडणूक आयोगाची अधिसूचना क्र.रानिआ /मनपा-२०२०/प्र.क्र.३/का.५, दि. २ /०२/२०२१

महोदय,

नवी मुंबई महानगरपालिकेची मुदत एप्रिल, २०२० मध्ये संपत होती. त्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम सुरु होता. मात्र दरम्यानच्या कालावधीमध्ये कोविड-१९ या

साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधीन क्र. ३ च्या पत्रान्वये निवडणुकांची कार्यवाही दि. १७ मार्च, २०२० रोजी आहे त्या टप्प्यावर स्थगित केली. सदर मतदार यादी ही १ जानेवारी, २०१९ या अर्हता दिनांकावर आधारित असल्याने नव्याने समाविष्ट झालेल्या मतदारांना मतदानाची तसेच निवडणूक लढविण्याची संधी देण्याच्यादृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधीन क्र. ४ च्या पत्रान्वये फेब्रुवारी-मार्च, २०२० मध्ये राबविलेला मतदार यादी कार्यक्रम रद्द केला. त्यानंतर जून व नोव्हेंबर, २०२० मध्ये मुदत संपणाऱ्या वसई-विरार व कोल्हापूर महानगरपालिकांच्या प्रभाग रचनेची कार्यवाही पूर्ण झाली असून त्याकरिता देखील मतदार यादी कार्यक्रम देणे आवश्यक आहे.

२. त्यानुसार नवी मुंबई, वसई-विरार व कोल्हापूर या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता तसेच इतर १६ महानगरपालिकांमधील २५ रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांकरिता मतदार यादीचा कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रामुख्याने ३ टप्पे असतात :-

(i) प्रभाग रचना

(ii) भारत निवडणूक आयोगाने विधानसभानिहाय तयार केलेल्या मतदार यादीचे Cut-off date रोजी प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय विभाजन

(iii) प्रत्यक्ष निवडणूक

३.१ नवी मुंबई, वसई-विरार व कोल्हापूर महानगरपालिकांची प्रभाग रचना अंतिम करण्यात आली असून मतदार यादीचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे.

३.२ खालील १६ महानगरपालिकांमधील २५ नगरसेवकांची पदे रिक्त झाल्याची सूचना राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झाली असून त्यांची पोटनिवडणूक घेण्याकरिता मतदार यादीचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे :-

| अ. क्र. | महानगरपालिका | प्रभाग / जागा क्रमांक | पद रिक्त झाल्याचा दिनांक | कारण |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ४ अ | २९/१२/२०१९ | निधन |
| २ | धुळे | ५ ब | १४/१/२०२० | राजीनामा |
| ३ | परभणी | ११ ब | ७/१/२०२० | निधन |
| ४ | | १४ क | १८/९/२०२० | निधन |
| ५ | ठाणे | ३० अ | ४/१/२०२० | जातप्रमाणपत्र अवैध |
| ६ | | १५ ड | २९/५/२०२० | निधन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | | २३ ड | १०/६/२०२० | निधन |
| ८ | अहमदनगर | ९ क | २७/२/२०२० | अनर्ह |
| ९ | नांदेड वाघाळा | १३ अ | २६/१/२०२० | निधन |
| १० | नागपूर | ८ ब | ४/३/२०२० | जात प्रमाणपत्र अवैध |
| ११ | मिरा भाईंदर | १० ड | ९/६/२०२० | निधन |
| १२ | मालेगाव | २० क | ६/४/२०२० | निधन |
| १३ | पिंपरी चिंचवड | १ ड | ४/७/२०२० | निधन |
| १४ | | १४ अ | ३१/७/२०२० | निधन |
| १५ | | ४ ब | २९/९/२०२० | निधन |
| १६ | उल्हासनगर | १४ ड | २/८/२०२० | निधन |
| १७ | | ८-क | १४/१२/२०२० | निधन |
| १८ | सोलापूर | ६ क | ४/६/२०२० | निधन |
| १९ | सांगली मिरज कुपवाड | १६ अ | २९/७/२०२० | निधन |
| २० | अकोला | ४ अ | ३/८/२०२० | निधन |
| २१ | | ८ क | १/११/२०२० | निधन |
| २२ | | ३-क | १३/११/२०२० | निधन |
| २३ | भिवंडी निजामपूर | ९-ब | २६/१०/२०२० | राजीनामा |
| २४ | पुणे | ८-क | २२/१२/२०२० | निधन |
| २५ | | २९-ब | २८/१२/२०२० | निधन |

४. एप्रिल-मे, २०२१ मध्ये होणाऱ्या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधीन क्र.५ च्या अधिसूचनेन्वये दि. १५ जानेवारी, २०२१ ही Cut-off date जाहीर केली असून, त्या दिवशी (म्हणजेच दि. १५ जानेवारी, २०२१ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी सार्वत्रिक/पोट निवडणुकीसाठी वापरण्यात येईल.

५. या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याकरीता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

**आदेश**

६. **मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती -** दिनांक ०१/०१/२०२१ हा अर्हता दिनांक धरुन भारत निवडणूक आयोगाकडून दिनांक १५/०१/२०२१ पर्यंत अद्ययावत केलेली विधानसभेची मतदार यादी नवी मुंबई, वसई-विरार व कोल्हापूर महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता तसेच वर नमूद केलेल्या महानगरपालिकांमधील पोटनिवडणुकांकरीता वापरण्यात येईल.

उपरोक्त निवडणुकांकरिता भारत निवडणूक आयोगाने दि. १५ जानेवारी, २०२१ पर्यंत प्रसिध्द केलेल्या मतदार यादीच्या आधारे प्रभागनिहाय मतदारांचे विभाजन करण्याची कार्यवाही तात्काळ सुरु करण्यात यावी. तसेच या कार्यालयाच्या क्र.रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.५३/का-५ च्या पत्रासोबतचे संगणकीकरण कक्षाचे दि.२६/१०/२०१७ च्या आदेशातील सूचनांनुसार कार्यवाही करावी.

७. वरील मतदार यादी ग्राह्य धरुन उपरोक्त महानगरपालिकेच्या सार्वत्रिक/रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील :-

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : | दि. १६/०२/२०२१ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : | दि.१६/०२/२०२१ ते दि.२३/०२/२०२१ |
| (iii) | प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | : | दि. ०३/०३/२०२१ |
| (iv) | मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे | : | दि.०८/०३/२०२१ |
| (v) | अंतिम प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे | : | दि. १२/०३/२०२१ |

८. **प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-**

८.१ महानगरपालिका आयुक्त यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे विभाजन राज्य निवडणूक आयोगाने महाऑनलाईनच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिलेल्या संगणक प्रणालीमार्फत करणे आवश्यक आहे. याकरिता थोडक्यात सूचना सोबतच्या सहपत्र-१ मध्ये जोडल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक टप्प्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

८.२ **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-**

अ) विधानसभा मतदार यादीत महानगरपालिकांच्या संबंधित प्रभागाच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि सार्वत्रिक/पोटनिवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे याची खातरजमा करण्यात यावी.

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.६/का५, दि.२४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी. तसेच दुबार नावांसमोर

विधानसभा निवडणुकांप्रमाणे विशिष्ट चिन्हे करुन अशा मतदारांच्या ओळखीचे पुरावे काटोकोरपणे तपासावेत.

क) मयत अथवा स्थलांतरित मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्र.-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का.५, दि.११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ड) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इत्यादीबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

**९. प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला महानगरपालिका आयुक्त यांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी. (परिच्छेद १० प्रमाणे)

**१०. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-**

१०.१ दिनांक १६/०२/२०२१ ते दिनांक २३/०२/२०२१ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल.

(i) लेखनिकांच्या काही चुका.

(ii) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

१०.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा करुन प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदार याद्या तयार करण्यात याव्यात. या मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदार याद्या सर्व राजकीय पक्षांना, उमेदवारांना, सर्व सर्च इंजिन, ट्रू व्होटर, महाव्होटर, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान प्रतिनिधी यांना विहित पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येतील.

११. परिच्छेद ८ प्रमाणे प्रारुप व परिच्छेद ९ प्रमाणे अंतिम प्रभागनिहाय (मतदान केंद्रनिहायसह) मतदार यादीस महानगरपालिका आयुक्त यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

(अ) महानगरपालिका मुख्य कार्यालय, प्रभाग समितीचे कार्यालय व इतर कार्यालयातील सूचनाफलक.

(ब) स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दीची सूचना देऊन.

(क) स्थानिक केबल टि.व्ही.वर प्रसिध्दीची सूचना देऊन.

(ड) महानगरपालिकांचे संकेतस्थळ, इत्यादि.

१२. राज्यात उद्‌भवलेल्या कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर प्रत्येक मतदान केंद्रास ७०० ते ८०० मतदार जोडण्यात यावेत.

१३. **आदर्श मतदान केंद्र स्थापन करणे** - महानगरपालिकेतील शक्यतो सर्व मतदान केंद्रे ही आदर्श असणे आवश्यक आहे. यासाठी आयोगाने वारंवार दिलेल्या सूचनांप्रमाणे काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक राहील. मतदान केंद्रावर मतदारांचा अनुभव सुखद असला पाहिजे याद्दष्टीने किमान सुविधा असणे आवश्यक आहे. याबाबत महानगरपालिका आयुक्त यांनी कल्पकतेचा विचार करावा. काही सुविधा उदाहरण म्हणून खालीलप्रमाणे असणे आवश्यक राहील :-

(i) मतदान केंद्र तळमजल्यावर असावीत. अपवादात्मक परिस्थितीत पहिल्या मजल्यावर मतदान केंद्र स्थापन करणे आवश्यक झाल्यास लिफ्ट अथवा मानवी डोलीची व्यवस्था करण्यात यावी.

(ii) मतदान केंद्राचे क्षेत्रफळ कमीत कमी २० चौ.मीटर असावे.

(iii) प्रवेशासाठी व बाहेर पडण्यासाठी शक्यतो स्वतंत्र दरवाजे असावेत.

(iv) विद्युत व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वतंत्र पुरुष-स्त्री प्रसाधनगृह असावे.

(v) मतदारांसाठी सावलीची व्यवस्था करण्यात यावी.

(vi) दिव्यांग व्यक्तिंसाठी रॅम्पची व्यवस्था करण्यात यावी.

(vii) प्रत्येक मतदान केंद्रावर व्हील चेअर उपलब्ध असावी.

१४. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त व नोडल अधिकारी (उपायुक्त, निवडणूक) यांची राहील.

१५. कोविड-१९ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे खबरदारी घेण्यात यावी :-

i) सर्वांच्या बैठकीची व्यवस्था पुरेसे अंतर ठेवून करणे.

ii) मास्क वापरणे.

iii) सामाजिक अंतर ठेवणे.

iv) सॅनिटायझरचा वापर करणे

v) आवश्यकतेनुसार थर्मल स्क्रिनिंग करणे.

तसेच शासनाने / महानगरपालिकेने कोविड-१९ च्या अनुषंगाने वेळोवेळी जाहीर केलेल्या विविध उपाययोजना व दक्षता घेण्याबाबत दिलेल्या सूचनांचे योग्य पालन करावे.

१६. आयोगाकडून देण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात आयोगाच्या नोडल अधिकारी (संगणकीकरण) यांच्याकडून आज्ञावली प्राप्त करुन घेण्यात यावी. यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या संगणकीकरण कक्षामधील खालील दूरध्वनी किंवा ई-मेलद्वारे त्यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२८८६९५०/२२०२२९०९, Email - sec.mh@gov.in

१७. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( अ. तु. सणस )
प्रभारी सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

२. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

४. जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर, कोल्हापूर, नाशिक, धुळे,परभणी, अहमदनगर, नांदेड, नागपूर, पूणे, सोलापूर,सांगली, व अकोला.

५. सहायक आयुक्त (जनसंपर्क), राज्य निवडणूक आयोग

६. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

७. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

८. निवड नस्ती (कार्या.५), राज्य निवडणूक आयोग.

माहे एप्रिल-मे,२०२१ या कालावधीत होणा-या महानगरपालिका, नगरपरिषदा / नगरपंचायती,जिल्हापरिषदा व पंचायत समित्या व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक/ रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीसाठी दि.१५ जानेवारी,२०२१ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्याबाबत

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.३/का.५
नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०००३२
दिनांक:- ०२ फेब्रुवारी, २०२१

## आदेश

क्र.रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.३/का-५, मुंबई महानगरपालिका अधिनियम,१८८८(१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १९ (१) (ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९) मधील कलम ७-अ, महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१(१९६२ चा महा.५) च्या कलम १३ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८(१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १०-अ व कलम १२ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, दिनांक १५ जानेवारी,२०२१ या दिवशी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या, या माहे एप्रिल ते मे २०२१ या कालावधीत होणा-या महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील असे अधिसूचीत करण्यात येत आहे.

मा.राज्य निवडणुक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(अविनाश सणस)
प्रभारी सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र